# महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग
## राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय
## डॉ. नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-४११००१.

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा निबंधक विवाह मंडळ व विवाह
(विभागस्तरीय समन्वय)
महाराष्ट्र राज्य, पुणे

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
वि.नों. विभाग ☎:- ०२०- २६०५८६१०
ना.नो.प विभाग :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल :- mahvivah@gmail.in
संकेतस्थळ :- arogya.maharashtra.gov.in


आरोग्य सेवा जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८२/वि.नों/दा.दुरुस्ती/२८४-२८५/१९.
दिनांक :-२० /०२ /२०१९.

प्रति,

उपकार्यकारी आरोग्य अधिकारी,
(मुख्यालय) बृहन्मंबई मनपा मुंबई.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद .......... सर्व.

विषय :- **विवाह नोंदणी दाखल्यामध्ये दुरुस्ती करण्याबाबत**.
संदर्भ :- शासनाचे पत्र क्रं.विनोका-२०१७/प्र.क्र.२९२/ कुक दि.२४/०१/२०१९.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विवाह नोंदणी करताना दाखल्यामध्ये दुरुस्ती करण्याबाबत ब-याच जिल्हयांकडून विचारणा केलेली होती, याबाबत शासनाकडून उपरोक्त संदर्भान्वये मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्राया नुसार ज्याअर्थी निबंधकास विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्याचे अधिकार आहेत त्याअर्थी General Clauses Act च्या कलम २१ नुसार निबंधकास नोंदणी प्रमाणपत्र दुरुस्त करण्याचे अधिकार आहेत.

विवाह नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित करण्याच्या अधिकारात विवाह नोंदणी प्रमाणपत्र दुरुस्त करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो, त्यामुळे विवाह निबंधकास विवाह नोंदणी प्रमाणपत्रात दुरुस्ती करण्याचे अधिकार देण्यात कोणतीही कायदेशीर अडचण नाही.

आपणास कळविण्यात येते की, आपण आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामिण व शहरी विभागातील विवाह निबंधकांना वर नमूद केल्याप्रमाणे कळवावे.

२०/२/१९

उपसंचालक आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ.) तथा
निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी
(विभागस्तरीय समन्वय),
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत सविनय सादर : मा. संचालक, आरोग्य सेवा तथा निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी (राज्यस्तर), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सस्नेह : उपसंचालक आरोग्य सेवा, आरोग्य मंडळ, ........... (सर्व)
२/ त्यांना विनंती की त्यांनी त्यांचे मंडळाच्या अधिपत्याखालील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना कळविण्यात यावे, यासाठी पाठपुरावा करावा.